MHBI160018602022

**नियमीत दिवाणी दावा क्र.११८५/२०२२**

**मधील नि.५ वरील आदेश**

**अशोक गर्कळ वि. उमाजी व इतर**

वादींनी प्रतिवादीं क्र. १ ते ५ विरुध्द तुर्तातुर्त मनाई हुकूम होवून मिळण्याकरीता दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम १ व २ प्रमाणे प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

**मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणेः**

२. मौजे घोगसपारगांव, ता. शिरुरकासार, जि.बीड येथील शेत जमीन गट नं.२५३ क्षेत्र ०.२२ आर. याच्या चतु:सिमा–

पुर्वेस – प्रतिवादी क्र.१ ते ३ व महादेव आश्रु गर्कळ,

पश्चिमेस – नामदेव उत्तम कराड,

उत्तरेस – महादेव दशरथ गर्कळ,

दक्षिणेस – रामकिसन निवृत्ती गर्कळ व वसुदेव निवृत्ती गर्कळ, महादेव उत्तम कराड

येणेप्रमाणे चतुःसिमेतील मिळकत ही प्रस्तुत अर्जाचा वाद विषय असून यापुढे सदर मिळकतीस सोईकरीता "दावा मिळकत" असे संबोधण्यात आले आहे.

**वादींचे अर्जातील कथन थोडक्यात खालीलप्रमाणेः**

३. दावा मिळकत ही वादी क्र.१ व ३ यांची वडलोपार्जित मिळकत असून दावा मिळकतीच्या अभिलेखास वादीच्या नावाची नोंद करण्यात आली आहे. वादी हे दावा मिळकतीचे मालक व कब्जेदार आहेत. परंतु, प्रतिवादी क्र.१ याने वादी विरूध्द नि.दि.दावा क्र.९३/२०१३ हा खोटा दावा गट नं.२६३ वरील मालकी हक्क जाहीर होवून मिळण्याकरीता व निरंतर मनाई हुकूमाकरीता दाखल केला होता. सदर दाव्याचा गैरफायदा घेवून प्रतिवादी क्र.१ ने दावा मिळकतीमधील ६आर. क्षेत्रावर अतिक्रमण केले होते. तसेच प्रतिवादी क्र.१ याने वादी क्र.१ व २ व इतर यांचे विरूध्द भा.द.वि. कलम ३०७, ३२६

प्रमाणे खोटी फिर्याद दाखल केली होती. सदरचे प्रकरण बीड येथील जिल्हा न्यायालयात प्रलंबित आहे. प्रतिवादी क्र.१ ने दाखल केलेल्या दाव्यामध्ये वादीने दावा मिळकती वरील मालकी हक्क जाहीर करणे करीता आणि निरंतर मनाई हुकूमा करीता प्रतिदावा दाखल केला होता. पुढे, सदर दाव्यात प्रतिवादी क्र.१ याने दुर्लक्ष केल्याने दि. ३०.०१.२०२० रोजी सदरचा दावा काढून टाकण्यात आला व त्याच वेळी वादीने प्रतिवादी क्र.१ ने केलेले अतिक्रमीत क्षेत्राचा ताबा परत घेतला.

४. दावा मिळकत गट नं.२५३ मधून उत्तर–दक्षिण नदी वाहते. सदर नदीच्या दोन्ही बाजूस वादीची उर्वरित दावा मिळकत असून नदीच्या पूर्व–पश्चिम बाजूस एकूण दावा मिळकतीचे क्षेत्र हे २२ आर. वादींच्या मालकी हक्क वहिवाटीत आहे. सदर मिळकतीशी प्रतिवादींचा कोणताही हक्क संबंध नाही. परंतु, प्रतिवादींनी दावा मिळकतीच्या पूर्व बाजूने वादीचे दावा मिळकतीवरील शांततामय कब्जेवहिवाटीस हरकत अडथळा करीत आहेत. दि.२५.०९.२०२२ रोजी सकाळी १०.०० वा. वादी हे दावा मिळकती मधील कापूस पिकावर फवारणी करण्यासाठी गेले असता प्रतिवादी क्र. १ ते ४ यांनी वादीस तुम्ही या जमीनीचे मालक नाहीत, तुमचा मालकी कब्जा पलीकडे आहे, नदी सुध्दा आमचेत हद्दी मध्ये आहे असे म्हणून वादीस शिवीगाळ केली. तसेच पूर्वेकडून वाद मिळकतीचा बांध फोडून हद्दीखुणा नष्ट केल्या.

५. वादींच्या मते प्रतिवादी हे गुंड प्रवृत्तीचे असून कायदा न जुमाननारे आहेत. प्रतिवादींनी वादींच्या दावा मिळकतीवरील कब्जेवहिवाटीस हरकत अडथळा करून दावा मिळकतीत रोजच हरकत करीत आहेत. करीता वादींनी प्रस्तुतचा दावा दाखल करुन तुर्तातूर्त ताकीदीचा अर्ज दाखल केला आहे.

६. वादींच्या मते, त्यांनी प्रथमदर्शनी केस शाबीत केली असून न्यायाचा समतोल त्यांच्या बाजूने आहे. अशा परिस्थितीत प्रतिवादींच्या विरुध्द मनाई ताकीद न दिल्यास वादीस त्यांचे ताब्यातील दावा मिळकत वहिवाटून उत्पन्न घेता येणार नाही. परिणामी वादीचे अपरिमित नुकसान होईल. शेवटी, वादींनी प्रस्तूतचा तुर्तातुर्त ताकिदीचा अर्ज मंजूर होणेस प्रार्थीले आहे.

७. प्रतिवादी क्र. १ ते ५ यांनी निशाणी क्र. २५ वर त्यांची कैफियत दाखल करुन वादींची कथने नाकारली आहेत. प्रतिवादींच्या मते दावा मिळकत ही केवळ महसूल अभिलेखावर नोंद असून प्रत्यक्षात मोक्यावर अस्तित्वात नाही. वादींनी केवळ महसूल अभिलेखाच्या नोंदी आधारे खोटा दावा व ताकीद अर्ज दाखल केला आहे. वास्तविक पाहता गट नं.२५३ चे क्षेत्र २२ आर. जमीनी पैकी ५ आर. क्षेत्र पडीक व नापीक आहे तर १० आर. क्षेत्रामध्ये वादीचे शेततळे आहे. उर्वरित ७ आर. क्षेत्र गट नं.२५३ मध्ये असणाऱ्या नदीमध्ये गेले आहे. त्यामुळे वादीस गट नं.२५३ मध्ये वहिती करीता कोणतेही क्षेत्र उपलब्ध नाही. वादीने दावा मिळकतीच्या चुकीच्या चतु:सिमा दिल्या असून चुकीचा नकाशा दाखल केला आहे. प्रतिवादी क्र.१ ने न्यायालयात नि.दि.दावा क्र.९३/२०१३ मालकी हक्क घोषणेकरीता दाखल केला होता. त्यानंतर गावपातळीवर बैठक होवून वादी व प्रतिवादी यांच्यात समझोता झाल्याने प्रतिवादी क्र.१ ने तो दावा चालविला नाही आणि त्यामुळे सदरचा दावा काढून टाकण्यात आला. परंतु, दावा काढून टाकल्यानंतर वादीने प्रतिवादी क्र.१ बाबत राग धरून प्रतिवादी क्र.१ वर प्राणघातक हल्ला केला. त्या अनुषंगे वादी विरूध्द गुन्हा दाखल झाला असून तो जिल्हा न्यायालयात प्रलंबित आहे. वादींनी कथन केलेली नदी वादींचे गट नं.२५३ मधून वाहते. नदीच्या पश्चिम दिशेस वादीचे क्षेत्र असून नदीच्या पूर्व दिशेस वादीस मिळकत नाही. त्यामुळे वादीचे ताब्यातील मिळकतीस प्रतिवादींनी हरकत अडथळा करण्याचा प्रश्नच निर्माण होत नाही.

८. प्रतिवादींनी पुढे असे कथन केले आहे की, वादींची प्रतिवादींच्या मिळकतीवर वाईट नजर असून प्रतिवादींची मिळकत हडप करण्याच्या उद्देशाने वादींनी प्रस्तुतचा खोटा दावा व ताकीद अर्ज दाखल केला आहे. वादीस दावा व ताकीद अर्ज दाखल करण्यास कोणतेही कारण घडले नाही. शेवटी प्रतिवादींनी वादींचा अर्ज नामंजूर करावा अशी विनंती केली आहे.

९. वरीलप्रमाणे वादीचा अर्ज, प्रतिवादीं क्र. १ ते ५ चे म्हणणे व अभिलेखावर दाखल कागदपत्रे पाहता. तसेच वादी व प्रतिवादी यांचे विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकता खालील मुद्दे माझे विचाराधीन आहेत. त्यावरील निष्कर्ष व त्यांची कारणमिमांसा खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | वादी सकृतदर्शनी केस त्यांचे बाजूने असल्याचे शाबीत करतात काय? | नाही. |
| २ | तुर्तातुर्त ताकिद न दिल्यास वादींचे अपरिमित नुकसान होईल काय? | नाही. |
| ३ | न्यायाचा तोल त्यांच्या बाजूने असल्याचे वादी शाबीत करतात काय? | नाही. |
| ४ | काय आदेश? | अर्ज नामंजूर. |

**:: <u>कारणमिमांसा</u> ::**

१०. वादीतर्फे विद्वान विधीज्ञ बी.ई. येळे तर प्रतिवादीं तर्फे विद्वान विधीज्ञ बी.बी. जायभाये यांचा युक्तीवाद ऐकला. वादींनी प्रस्तुत अर्जाच्या पुष्ठयर्थ अभिलेखावर दावा मिळकतीचा ७/१२ उतारा , गाव नमुना नं.८ चे उतारे, फेरफार क्र.५०६ चा उतारा व नि.दि.दावा क्र.९३/२०१३ मधील वादपत्र, कैफियत व प्रतिदाव्याच्या प्रती दाखल केल्या आहेत.

**<u>मुद्दा क्रमांक १ ते ३</u>–**

११. मुद्दा क्र.१ ते ३ चे अनुषंगे प्रस्तुतचा ताकीदीचा अर्ज निकाली करते समयी वादींनी त्यांची प्रथमदर्शनी केस म्हणजेच दावा दाखल करतेसमयी दावा मिळकत अस्तित्वात आहे व ती वादींचे ताबेवहिवाटीत असून प्रतिवादी हे वादींचे दावा मिळकतीवरील ताबेवहिवाटीस हरकत अडथळा करीत आहेत याबाबी शाबीत केल्या आहेत काय हे पाहणे गरजेचे आहे.

१२. मुद्या क्र.१ ते ३ च्या अनुषंगे अभिलेखावर उपलब्ध वादी व प्रतिवादी यांची परस्पर विरोधी कथनांचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, वादींच्या मते दावा मिळकत गट नं.२५३ चे मधून नदी गेली असून सदर नदीच्या दोन्ही बाजूस वादींची गट नं.२५३ ही मिळकत आहे. तर सदर गट नं.२५३ च्या पूर्वेस प्रतिवादींची मिळकत असून प्रतिवादी हे वादींच्या नदी पलीकडील पूर्व बाजूच्या दावा मिळकतीवरील कब्जेवहिवाटीस

हरकत अडथळा करीत आहेत. उलटपक्षी प्रतिवादींची कथने पाहिली असता प्रतिवादींनी वादींची कथने नाकारुन वादींनी कथन केलेल्या नदीच्या पूर्व बाजूस वादीस गट नं.२५३ मधील मिळकत शिल्लक नसल्याचे कथन केले आहे.

१३. वादी व प्रतिवादी यांचेत वर नमूद परस्पर विरोधी कथनावरुन वादीस गट नं.२५३ मधील नदीच्या पूर्वेस मिळकत शिल्लक आहे हे शाबीत करणे गरजेचे आहे. त्या अनुषंगे अभिलेखावर उपलब्ध पुराव्याचे अवलोकन केले असता वादींनी केवळ गट नं.२५३ चा ७/१२ उतारा, वादींच्या नावाचे गाव नमुना नं.८अ चे उतारे व फेरफार क्र.५०६ ची प्रत तसेच नि.दि.दावा क्र.९३/२०१३ ची प्रत दाखल केली आहे. सदर दस्तऐवजाचे अवलोकन केले असता, दावा मिळकतीच्या ७/१२ उता–यावरुन वादींच्या नावे दावा मिळकत नोंद असल्याचे दिसून येते. तसेच नि.दि.दावा क्र.९३/२०१३ चे दस्तऐवजावरुन वादी व प्रतिवादी यांच्यात पुर्वी दावा मिळकती संदर्भात वाद उपस्थित होवुन दावा दाखल झाला होता. परंतु सदरचा दावा हा काढून टाकण्यात आल्याचे दिसून येते. सदरच्या दाव्यात प्रतिवादींनी कोठेही वादींची दावा मिळकत नदीच्या पलीकडे पुर्व बाजुस शिल्लक असल्याचे मान्य केलेले नाही.

१४. वादीं मार्फत दाखल लेखी दस्तऐवजावरुन दावा मिळकत गट नं.२५३ या मिळकतीपैकी काही भाग नदीच्या पलीकडे पुर्व बाजुस आहे ही बाब दिसून येत नाही. वादींनी दावा मिळकत नदीच्या पलीकडे पुर्व बाजुस आहे हे दर्शविण्याकरीता दावा मिळकतीचा नकाशा अथवा इतर महसूली नकाशा अभिलेखावर दाखल केलेला नाही. तसेच दावा मिळकत क्षेत्र ०.२२ हे. आर. पैकी किती क्षेत्र पोट खराब आहे ते कुठे येते, शेततळे आणि नदी करीता किती क्षेत्र गेले आहे आणि नदीच्या पुर्व बाजुस किती क्षेत्र शिल्लक आहे याबाबत कोणतीही माहिती दिली नाही. अशा परिस्थितीत अभिलेखावर उपस्थित पुराव्यावरुन दावा मिळकतीपैकी काही क्षेत्र हे नदीच्या पलीकडे पुर्व बाजुस आहे ही बाब प्रथमदर्शनी शाबीत झाली असे म्हणता येणार नाही.

१५. एकंदरीत मुद्या क्र.१ ते ३ बाबत वरील विवेचनावरुन असे दिसून येते की, वादींनी जरी त्यांचे कथनात वादीस गट नं.२५३ मधील नदीच्या पलीकडे पूर्वेस दावा

मिळकत क्षेत्र शिल्लक असल्याचे कथन केले असले तरी सदरची बाब शाबीत होईल असा प्रथमदर्शनी पुरावा वादींनी अभिलेखावर आणलेला नाही. अभिलेखावर उपलब्ध पुराव्या आधारे वादींची दावा मिळकती मधील नदीच्या पूर्व दिशेस वादीस दावा मिळकत उपलब्ध असून दावा दाखल करतेसमयी वादींची सदर दावा मिळकतीमध्ये कब्जेवहिवाट आहे हि बाब शाबीत होत नाही. परिणामी, वादी हे त्यांची प्रथमदर्शनी केस म्हणजेच दावा दाखल करतेसमयी वादी हे दावा मिळकतीचे कब्जेवहिवाटीत असून त्यास प्रतिवादी क्र. १ ते ५ हे हरकत अडथळा करीत आहेत ही बाब शाबीत करण्यास अपयशी ठरले आहेत. अशा परीस्थीतीत प्रस्तूतचा तुर्तातुर्त ताकिदीचा अर्ज नामंजूर झाल्यास वादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. परीणामी, दाव्याचा समतोल देखील वादीच्या बाजूने नसल्याचे दिसून येते. करीता, मी मुद्दा क्र.१ ते ३ नकारार्थी उत्तरीत करीत आहे.

**<u>मुद्दा क्र. ४ बाबतः–</u>**

१६. मुद्दा क्र. १ ते ३ बाबत वर नमूद चर्चेवरुन दावा मिळकती संदर्भात तुर्तातुर्त ताकिदीसाठी लागणाऱ्या आवश्यक बाबी म्हणजेच प्रथमदर्शनी केस, न्यायाचा तोल व अपरिमित नुकसान या बाबी वादी शाबीत करण्यास असमर्थ ठरले आहेत. त्यामुळे, वादींचा तुर्तातुर्त ताकिदीचा अर्ज नामंजूर होण्यास पात्र असल्याने मुद्दा क्र. ४ करीता मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

१. अर्ज नामंजूर करण्यात येतो.

२. अर्जाचा खर्च दाव्याच्या अंतिम निकालावर अवलंबून राहील.

AKSHAY SAMBHAJI JAGTAP
Digitally signed by AKSHAY SAMBHAJI JAGTAP
Date: 2024.07.16 11:24:27 +0530

शिरुरकासार
दि. १५.०७.२०२४

**(अ.सं.जगताप)**
दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
शिरुरकासार

"I affirm that the contents of this PDF file are word to word as per original Judgment/order".

Sd/-
[P.B. Kusumkar]
Stenographer Grade-3

| | | |
|---|---|---|
| Dictated on | : | 15/07/2024 |
| Transcribed on | : | 15/07/2024 |
| Checked & signed on | : | 15/07/2024 |